# डॉ. बाळासाहेब सावंत कोकण कृषि विद्यापीठ, दापोली

## आजपर्यंत विद्यापीठांनी संयुक्त कृषि संशोधन व विकास समितीव्दारे संशोधन शिफारशी केलेले पिकनिहाय तंत्रज्ञान

| | | |
|---|---|---|
| **पीक व वाण** | : | **भुईमूग** |
| **शिफारशींचा तपशिल (वर्षनिहाय)** | : | **वर्ष - २००४** |
| खत व्यवस्थापनाबद्दल शिफारशी | : | कोकणातील जांभ्या जमिनीची आम्लता कमी करुन खरीप भुईमूगाच्या कोकण टपोरा, कोकण गौरव, टी.जी. २६ आणि एम-१३ या वाणांपासून अधिक उत्पादन मिळविण्यासाठी शिफारशीत खतमात्रेसोबत जमिनीच्या चुन्याच्या गरोच्या १० टक्के कॅलशियम कार्बोनेट स्वरुपातील चुना १५ दिवस पेरणीपूर्वी द्यावा. |
| **शिफारशींचा तपशिल (वर्षनिहाय)** | : | **वर्ष - २००५** |
| पीक व्यवस्थापनाबद्दल इतर शिफारशी | : | १. भात आणि भुईमूग पीक पध्दतीपासून सर्वात जास्त फायदा मिळण्यासाठी भुईमूगाला केवळ शिफारस केलेल्या खताच्या (२५ किलो नत्र अधिक ५० किलो स्फुरद/हेक्टर) मात्रेसोबत ५ टन कंपोस्ट/फॉस्फोकंपोस्ट द्यावे. तसेच भातासाठी शिफारस केलेली रासायनिक खते (१००:५०:५० किलो नत्र, स्फुरद/हेक्टर) यांचा वापर करावा अशी कोकण विभागातील जांभ्या जमिनीसाठी शिफारस करण्यात येत आहे.<br>२. भात आणि भुईमूग पीक पध्दतीमध्ये अधिक फायदा मिळण्यासाठी ग्लिरिसीडीया किंवा शेणखत प्रती हेक्टरी ५ टन आणि नत्र, स्फुरद व पालाश १००:५०:५० किलो/हेक्टर याचा वापर भात पिकासाठी आणि निव्वळ शिफारस केलेली खते २५:५० किलो नत्र, स्फुरद/हेक्टर त्यानंतर घेण्यात येणा-या भुईमूगासाठी वापराावित. |
| **शिफारशींचा तपशिल (वर्षनिहाय)** | : | **वर्ष - २०१२** |
| काढणीपश्चात तंत्रज्ञानाबद्दल शिफारशी | : | रब्बी हंगामात तयार झालेले भुईमूग बियाणे ६ टक्के ओलाव्यापर्यंत वाळवून ॲल्यमिनियम फॉईल बॅगमध्ये साठवणूक करुन ते पुढील रब्बी हंगामामध्ये वापरण्याची शिफारस करण्यात येते. |
| **शिफारशींचा तपशिल (वर्षनिहाय)** | : | **वर्ष - २०१३** |
| खत व्यवस्थापनाबद्दल शिफारशी | : | १. कोकणातील जांभ्या जमिनीत रब्बी उन्हाळी भुईमुगापासून अधिक उत्पादन आणि नफा मिळण्यासाठी १०० टक्के शिफारसीत रासायनिक खताची मात्रा (२५ कि.ग्रॅ. नत्र, ५० कि.ग्रॅ. स्फुरद) पेरणीच्यावेळी आणि पेरणीनंतर एक महिन्याने शिफारसीत रासायनिक खताची ५० टक्के मात्रा (१२.५ कि.ग्रॅ. नत्र, २५ कि.ग्रॅ. स्फुरद) देण्याची शिफारस करण्यात येत आहे.<br>२. दक्षिण कोकणात जांभ्या जमिनीत भुईमुग पिकापासून खरीप हंगामात अधिक उत्पादन आणि निव्वळ नफा मिळण्यासाठी पिकाला पेरणीच्यावेळी हेक्टरी २० कि.ग्रॅ. झिंक सल्फेट शिफारस केलेल्या खताच्या (२५ कि.ग्रॅ. नत्र + ५० कि.ग्रॅ. स्फुरद) मात्रेसोबत देण्याची शिफारस करण्यात येत आहे. |
| पीक व्यवस्थापनाबद्दल इतर शिफारशी | : | दक्षिण कोकणात रब्बी-उन्हाळी भुईमुगात परिणामाकारक आणि किफायतशिर तण नियंत्रणासाठी पेंडीमिथॅलिन तणनाशकाची उगवणीपूर्व फवारणी हेक्टरी १.०० कि.ग्रॅ. प्रमाणात आणि पेरणीनंतर ३० ते ३५ |

| | | |
|---|---|---|
| | | दिवसांनी एक बेणणी करण्याची शिफारस करण्यात येते. तथापि, बेणणीसाठी मजूरांची टंचाई असल्यास पेंडीमिथॅलिन तणनाशकाची हेक्टरी १.०० कि.ग्रॅ. प्रमाणात उगवणीपूर्व फवारणी करुन पेरणीनंतर २० दिवसांनी क्विझालफॉप इथाईल हेक्टरी ५० ग्रॅम किंवा इमॅझथॅपर हेक्टरी ७५ ग्रॅम या प्रमाणात उगवणीपश्चात तणनाशकाची फवारणी करण्याची शिफारस करण्यात येत आहे. |
| इतर | : | विस्तार शिक्षण :<br>गळीतधान्य पिकांची उत्पादकता व पिकांच्या सुधारित जातीखालील क्षेत्र वाढविण्यासाठी विस्तार यंत्रणांनी प्रथम रेषीय प्रात्यक्षिके समुह पध्दतीने आयोजित करावीत अशी शिफारस करण्यात येते. |
| **शिफारशींचा तपशिल (वर्षनिहाय)** | : | **वर्ष - २०१४** |
| पीक व्यवस्थापनाबद्दल इतर शिफारशी | : | कोकणातील जांभ्या जमिनीतून खरीप भुईमुगाचे किफायतशीर उत्पादन आणि आर्थिक नफा मिळण्यासाठी आर्थिक उपलब्धतेनुसार प्रथम प्राधान्याने खत व्यवस्थापनास महत्व देवून त्या खालोखाल अनुक्रमे तण नियंत्रण आणि पिक संरक्षण हे घटक विचारात घ्यावेत. |
| **शिफारशींचा तपशिल (वर्षनिहाय)** | : | **वर्ष - २०१५** |
| खत व्यवस्थापनाबद्दल शिफारशी | : | कोकणातील जांभ्या जमिनीत रब्बी भुईमुग पिकापासून अधिक उत्पादन व नफा मिळविण्यासाठी ५ टन/हेक्टर शेणखत अधिक २५:५०:३० नत्र:स्फुरद:पालाश किलो/हेक्टर मात्रेसोबत रायझोबियम व स्फुरद विरघळविणाऱ्या जीवाणू संवर्धनाची अनुक्रमे २० ते ५० ग्रॅम/किलो बियाणे बीजप्रक्रिया करण्याची शिफारस करण्यात येते. |
| इतर | : | सामाजिक शास्त्रे :<br>१. डॉ. बाळासाहेब सावंत कोकण कृषि विद्यापीठाने कोकण विभागासाठी कमी कालावधीचा भुईमूगाचा वाण विकसित करण्याची शिफारस करण्यात येते.<br>२. कोकण विभागामध्ये भुईमूगाची उत्पादकता वाढविण्यासाठी विस्तार यंत्रणांनी भुईमूगामध्ये प्लॅस्टिक आच्छादनाचा वापर व रिकामे पिंप फिरविणे या तंत्रज्ञानाची समूह प्रात्यक्षिके प्रकल्पाच्या स्वरुपात मोठ्या प्रमाणावर घ्यावी अशी शिफारस करण्यात येत आहे. |
| **शिफारशींचा तपशिल (वर्षनिहाय)** | : | **वर्ष - २०१६** |
| खत व्यवस्थापनाबद्दल शिफारशी | : | १. कोकण विभागात खरीप भात-रब्बी भुईमुग पीक पध्दतीमध्ये तणांचे प्रभावी नियंत्रण होऊन अधिक उत्पादन व नफा मिळविण्यासाठी हिरवळीचे पीक धैंचा चिखलणीच्यावळी जमिनीत गाडून भात लागवडीनंतर प्रेटील्याक्लोर ५० ई.सी. ०.७५ किलो क्रियाशिल घटक प्रती हेक्टरी ३ ते ७ दिवसांनी आणि भुईमुगासाठी पेंडीमिथॅलीन ३० ई.सी. १ किलो क्रियाशिल घटक प्रती हेक्टरी पेरणीनंतर २ ते ३ दिवसांनी फवारावे.<br>२. दक्षिण कोकण किनारपट्टी विभागात रब्बी भुईमुग-खरीप भात पीक पध्दतीतून अधिक उत्पादन आणि नफा मिळण्यासाठी भुईमुग पिकास प्रती हेक्टरी २५ किलो नत्र, ७५ किलो स्फुरद आणि खरीप भात पिकास शिफारशीत खत मात्रेच्या ७५ टक्के मात्रा (७५:३७:५०:३७.५० नत्र, स्फुरद, पालाश किलो प्रती हवे टरी) द्यावी. |

| | | |
|---|---|---|
| पीक व्यवस्थापनाबद्दल इतर शिफारशी | : | कोकण विभागात खरीप भुईमुगापासून अधिक उत्पादन आणि नफा मिळविण्यासाठी पिकाची लागवड रुंद वरंबा सरीवर ८० × २० सेमी/हे.) ७ मायक्रॉन जाडीचे, ४४ किलो पारदर्शक प्लॅस्टिक आच्छादन करावे. |
| **शिफारशींचा तपशिल (वर्षनिहाय)** | : | **वर्ष - २०१७** |
| खत व्यवस्थापनाबद्दल शिफारशी | : | १. कोकणातील जांभ्या जमिनीमध्ये रब्बी भुईमुगाचे अधिक उत्पादन आणि आर्थिक नफा मिळविण्यासाठी पिकास पेरतेवेळी प्रती हेक्टरी ७.५ टन शेणखत आणि शिफारशीत खत मात्रेच्या १२५ टक्के (३१.२५ किलो नत्र आणि ६२.५ किलो स्फुरद) खत मात्रा देण्याची शिफारस करण्यात येत आहे.<br>२. रब्बी भुईमूगापासून अधिक उत्पादन व नफा मिळविण्यासाठी २५ टक्के पाणी बचत आणि कार्यक्षम पाणी वापरासाठी पॉलिथीन आच्छादन वापरुन पिकास हायड्रोजेल ५ किलो/हेक्टर आणि एकात्मिक खत व्यवस्थापनेची (शेणखत ७.५ टन/हेक्टर तसेच २५ किलो नत्र आणि २५ किलो स्फुरद/हेक्टर) शिफारस करण्यात येते. |
| पीक व्यवस्थापनाबद्दल इतर शिफारशी | : | पोषक संसाधने पुरेशा प्रमाणात उपलब्ध असल्यास कोकणातील जांभ्या जमिनीत रब्बी भुईमूगापासून अधिक नफा आणि उत्पादन मिळविण्यासाठी शिफारशीत पीक पध्दतींचा म्हणजेच प्रती हेक्टर ७.५ टन शेणखत, २५ किलो नत्र व ५० किलो स्फुरद, पीक संरक्षण आणि तणनियंत्रण वापरण्याची शिफारस करण्यात येते. तथापि, संशोधनांमध्ये कमतरता असल्यास तण नियंत्रणास प्रथम प्राधान्य देऊन त्याखालोखाल अनुक्रमे खत व्यवस्थापन आणि पीक संरक्षण हे घटक विचारात घ्यावेत. |
| **शिफारशींचा तपशिल (वर्षनिहाय)** | : | **वर्ष - २०१८** |
| पीक व्यवस्थापनाबद्दल इतर शिफारशी | : | उत्तर कोकण किनारपट्टी विभागात 'भात-भुईमूग' 'भात-मधुमका' आणि 'भात-घेवडा' या सेंद्रिय पिक पद्धतीपासून अधिक उत्पादन आणि आर्थिक फायदा मिळण्यासाठी खालील तपशिलानुसार विविध स्त्रोतातून अन्नद्रव्य व्यवस्थापनाची शिफारस करण्यात येते. |

| स्त्रोत | खरीप | रब्बी पिके | | |
|---|---|---|---|---|
| | भात | भुईमूग | मधुमका | घेवडा |
| शेणखत (टन प्रति हेक्टर) | ५.० | १.५ | ६.० | ४.० |
| गिरीपुष्पाचा हिरवा पाला (टन प्रति हेक्टर) | ७.५ | -- | -- | -- |
| निबोंळी पेंड (टन प्रति हेक्टर) | ०.५ | ०.१५० | ०-६ | ०.४ |
| भाताचा पेंढा (टन प्रति हेक्टर) | ४.० | -- | -- | -- |
| गांडूळखत (टन प्रति हेक्टर) | -- | ०.५ | २.० | १.३ |
| गोमुत्र आणि गांडूळ पाणी यांच्या प्रत्येकी १० टक्के द्रावणाच्या पेरणीनंतर ३० व ६० दिवसांनी दोन फवारण्या (लि./हे.) | -- | -- | ५० | -- |